नांदेडमध्ये एकाच साखर कारखान्यात 'सहकार'!

संजीव कुळकर्णी

नांदेड : महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतरच्या ५० वर्षांत नांदेड जिल्ह्यामध्ये सहकार क्षेत्रातून सात साखर कारखाने उभे राहिले. आज ६६ व्या वर्षात 'सहकार'चे केवळ एक कारखाना प्रचंड तोट्यात, कसाबसा सुरू आहे. चार सहकारी साखर कारखान्यांवर खासगी-मालकशाहीचे झेंडे फडकत आहेत. मागील काही वर्षांत याच जिल्ह्यात एका नव्या खासगी कारखान्याची भर पडली. सहकार क्षेत्रातील दोन कारखाने कर्जबाजारीपणामुळे बंद अवस्थेत आहेत.

मराठवाड्याची कोरडी-भाजकी भूमी ज्यांनी वेगवेगळ्या सिंचन प्रकल्पांच्या जाळ्यातून 'भिजकी' केली ते शंकरराव चव्हाण आणि सहकारातील अफाट कामांमुळे पद्म पुरस्काराने मराठवाड्यातील पहिले मानकरी श्यामराव कदम यांच्या कर्मभूमीतील सहकारी साखर कारखानदारीतले हे विदारक चित्र राज्यभर पसरले आहे. खुद्द कदम जिल्ह्यातील ज्या पहिल्या-कलंबर कारखान्याचे पहिले अध्यक्ष होते, तो कारखानाही मागील अनेक वर्षांपासून बंद होता. जिल्हा सहकारी बँकेने तो गतवर्षी एका खासगी संस्थेला विकला.

राज्य स्थापनेनंतरच्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने गेल्या मंगळवारी मुंबईमध्ये आयोजित केलेल्या एका परिसंवादात राज्याचे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी सहकार चळवळीसह या क्षेत्रातील साखर कारखानदारीच्या आजच्या एकंदर परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली होती. सहकारी साखर कारखाने बुडवणाऱ्यांनीच आपले कारखाने खाजगीरित्या विकत घेतल्याचे पवारांनी नमूद केले होते. नांदेड जिल्ह्यात नायगाव तालुक्यातील 'जय अंबिका' कारखान्याच्या बाबतीत पवार म्हणतात, तसे घडले आहे.

राज्य स्थापनेनंतरच्या पहिल्या दोन दशकांत नांदेड जिल्ह्यात सहकार क्षेत्रातून 'कलंबर' आणि 'गोदावरी मनार' हे दोन कारखाने उभे राहिले. नंतरच्या २५ वर्षांत 'शंकर', 'भाऊराव चव्हाण', 'जय अंबिका', 'हुतात्मा जयवंतराव पाटील' आणि 'जयशिवशंकर' हे सहकारी साखर कारखाने वेगवेगळ्या भागांत सुरू झाले. पण आज शंकर, जय अंबिका, हुजपा आणि जय शिवशंकर हे चार कारखाने खासगी क्षेत्रात गेले असून पहिल्या पर्वातील दोन्ही सहकारी साखर कारखाने बंद आहेत. त्यातील कलंबरच्या मालमत्तेची विक्री करून जिल्हा बँकेने आपले कर्ज वसूल केले.

जिल्ह्यातील प्रभावशाली राजकीय कुटुंबांशी संबंधित 'भाऊराव चव्हाण' हा एकमेव साखर कारखाना सहकार तत्त्वावर सुरू असला, तरी या संस्थेमध्ये 'सहकार' केवळ कागदोपत्री असल्याचे दिसते. या कारखान्याचे अध्यक्षपद आता वरील राजकीय कुटुंबातच गेले आहे. सुमारे १५ वर्षांपूर्वी 'भाऊराव चव्हाण'ने जिल्ह्यातील दोन सहकारी साखर कारखाने राज्य बँकेच्या लिलाव प्रक्रियेतून विकत घेतले होते. नंतर काही वर्षे हे कारखाने चालवल्यानंतर व्यवस्थापनाने हे दोन्ही प्रकल्प खासगी संस्थांना विक्री केले.

सोलापूर विभाग खासगीत अव्वल!

साखर आयुक्तालयाने राज्यातील साखर उद्योगाची आठ विभागांमध्ये विभागणी केली आहे. त्यात कोल्हापूर हा सर्वात मोठा विभाग असून या विभागात सहकार व खासगी कारखान्यांची संख्या २६:१४ अशी आहे. सोलापूर विभागात २८ खासगी तर १७ सहकारी साखर कारखाने आहेत. नांदेड विभागात १९ खासगी आणि १० सहकारी साखर कारखाने आहेत. विदर्भातील दोन विभागांत ७ पैकी ६ कारखाने खासगी क्षेत्रात आहेत. राज्यातील सहकारी साखर कारखानदारीचा पाया ज्या अहिल्यानगर जिल्ह्यात घातला गेला त्या जिल्ह्यातही खासगी कारखानदारी (संख्या-१२) फोफावली आहे. या विभागात १४ सहकारी साखर कारखाने आहेत. कोल्हापूर आणि पुणे हे दोन विभाग सहकारी साखर कारखानदारीच्या बाबतीत (संख्या -२६ व १८) अव्वल स्थान राखून आहेत.

सहकारी कारखान्यांची संख्या २०९ वरून १०३ पर्यंत

राज्य बँकेचे मुख्य प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यात एकेकाळी सहकारी साखर कारखान्यांची संख्या २०९ होती. ती आता १०३ पर्यंत खाली आली आहे. सरलेल्या हंगामात १०४ खासगी कारखान्यांमध्ये उसाचे गाळप झाले. तर मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये एकंदर ५१ साखर कारखाने असून त्यांतील निम्म्याहून जास्त म्हणजे २८ साखर कारखाने खासगी क्षेत्रात आहेत. तर २३ कारखाने सहकारी क्षेत्रात सुरू असल्याचे २०२४-२५ च्या गाळप हंगामाच्या अहवालातून दिसून आले.

उमरग्याला वादळाचा फटका; वीज पडून तरुणाचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्याला मंगळवारी व बुधवारी वादळवाऱ्याचा फटका बसला. तालुक्यातील सावळसूर येथील सोमनाथ पंडित बिराजदार (वय २४) यांचा वीज पडून बुधवारी दुपारी मृत्यू झाला.

उमरगा व परिसरात मंगळवारीही जोरदार वादळवारे होऊन पडझड झाली. दोन दिवसांपासून विजांचा कडकडाट व वादळवाऱ्यासह अवकाळी पाऊस सुरू आहे. दरम्यान चार ठिकाणी वीज कोसळून पाच जनावरे दगावली. वादळीवाऱ्यामुळे झाडे व फांद्या तुटल्या. उमरगा पालिकेसमोरील झाड कोसळून बारा दुचाकींचे मोठे नुकसान झाले. अनेक फलकेही कोसळली. काही घरांवरील पत्रे उडाली. कुन्हाळी भागातील पानमळ्यांचे नुकसान झाले. दरम्यान, माडज येथील घोडा, गुरुवाडी, मुळज येथील अनुक्रमे दोन व एक मिळून तीन गायी दगावल्याची माहिती आहे. तर बुधवारी दुपारी सावळसूर येथील सोमनाथ बिराजदार यांचा वीज पडून मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच आमदार प्रवीण स्वामी यांनी बिराजदार कुटुंबियांचे सांत्वन केले. तसेच तहसीलदार येरमे यांना दूरध्वनी करून या बिराजदार कुटुंबियांना मिळणारी मदत तात्काळ द्यावी, अशी सूचनाही केली.

विद्यार्थिनीची कमी गुणावरून आत्महत्या

नांदेड : शहरातील अंबानगर परिसरात राहणाऱ्या रोशनी रवींद्र पगारे या दहावीच्या विद्यार्थिनीने कमी गुण मिळाल्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी दुपारी उघडकीस आली. रोशनीला दहावीच्या परीक्षेत ७३.८० टक्के गुण मिळाले होते.

दानवे यांच्या निवडीमागे भाजपचे 'जालना महापालिका' लक्ष्य

लोकसत्ता, वार्ताहर

जालना : भाजपच्या जालना शहर जिल्हा अध्यक्षपदासाठी भास्कर दानवे यांच्या नावाची झालेली घोषणा आगामी स्थानिक महानगरपालिका निवडणुकीच्या संदर्भात महत्त्वाची मानली जात आहे. ते ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांचे चुलतबंधू आणि राजकीय महत्त्वाकांक्षा असणारे नेते आहेत. पक्षाच्या मावळत्या जिल्हा कार्यकारिणीत ते उपाध्यक्ष होते. महानगरपालिका अस्तित्वात येण्यापूर्वी ते जालना नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी राहिलेले आहेत. पक्ष संघटनेत त्यांच्याकडे सध्या जालना विधानसभा क्षेत्रप्रमुखाचीही जबाबदारी आहे.

दोनदा आमदार, पाच वेळेस खासदार, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि जिल्हा अध्यक्ष, केन्द्रात राज्यमंत्री, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष इत्यादी अनेक पदांवर राहिलेले भाजपचे जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांच्या अधिपत्याखाली यापूर्वी कधीही जालना नगर परिषद येऊ शकलेली नाही. शिवसेनेशी युती असताना कायम उपाध्यक्षपद भाजपकडे असायचे. कारण नेहमी शिवसेनेचे अधिक नगरसेवक निवडून येत असत. जिल्हा परिषद, काही पंचायत समित्या, भोकरदन नगर परिषद, रामेश्वर सहकारी साखर कारखाना इत्यादींवर रावसाहेब दानवे यांचे अधिपत्य राहिलेले असले, तरी जालना नगर परिषद ही अशी एकमेव संस्था आहे, की जेथे दानवेंचे अधिपत्य कधीच राहिलेले नाही. मागील चार दशकांत एकदाच जालना नगराध्यक्षपद भाजपकडे राहिलेले आहे. साडेतीन दशकांपूर्वी भाजपचे (दिवंगत) व्यंकटेश गोरंट्याल नगराध्यक्ष झाले होते, तेव्हा रावसाहेब दानवे आमदारही झालेले नव्हते. जालना शहर आणि येथील महानगरपालिकेचे महत्त्व रावसाहेब दानवे ओळखून आहेत. जालना शहरातील स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या हातात द्या, शहराचा विकास करून दाखवितो असे आवाहनही त्यांनी जनतेला यापूर्वी अनेकदा केलेले आहे. त्यामुळे या दृष्टीने पक्षाच्या जालना शहर जिल्हाध्यक्षपदी भास्कर दानवे यांच्या नावाची झालेली घोषणा महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

पक्षाच्या जिल्हा (ग्रामीण) अध्यक्षपदी आमदार नारायण कुचे यांच्या नावाची घोषणा झाली आहे. प्रारंभी चर्चेत असलेली अनेक नावे मागे पडून शेवटी बद्री पठाडे, राहुल लोणीकर आणि आमदार कुचे ही नावे स्पर्धेत राहिली होती. आमदार कुचे हे रावसाहेब दानवे यांचे समर्थक आहेत. सलग तिनदा ते आमदार झालेले आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एखाद्या आमदारांस जिल्हाध्यक्ष करावे असा प्रवाहही पक्षामध्ये होता. या पार्श्वभूमीवर परतूरचे आमदार बबनराव लोणीकर यांनी आपले वजन आमदार कुचे यांच्या पारड्यात टाकले. दानवे यांचे निकटवर्तीय अशी कुचे यांची राजकीय ओळख असली तरी अलीकडच्या काळात आमदार लोणीकर यांनी त्यांच्याशी साधलेली जवळीक जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय आहे. कुचे यांच्या निवडीमागे लोणीकर आणि रावसाहेब दानवे यांच्यातील पक्षांतर्गत सुप्त संघर्षाची किनार असल्याचेही मानले जाते.

> पक्षाच्या जालना शहर अध्यक्षपदाची दिलेली अबाबदारी आपण प्रामाणिकपणे पार पाडू. आगामी महापालिका निवडणुकीसंदर्भात आता आपल्यावर अधिक जबाबदारी आहे. जालना जिल्हा (ग्रामीण) अध्यक्षपदी आमदार नारायण कुचे यांची निवड जिल्ह्यातील सर्व नेत्यांच्या एकमताने झालेली आहे. राज्यातील संघटनात्मक पदे देताना अनुसूचित जातींचा विचार करण्याचे पक्षाचे धोरण आहे. त्यामुळे सलग तीन वेळेस आमदार झालेल्या कुचे यांच्या नावाचा जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) पदासाठी विचार झाला. सर्व समाजघटकांना सोबत घेऊन चालण्याची त्यांची भूमिका असते.
> **– भास्कर दानवे,** अध्यक्ष, जालना शहर जिल्हा, भाजप

डिसेंबरअखेर तुळजापूरच्या रामदरा तलावात उजनीचे पाणी

आमदार राणा पाटील यांची माहिती

छत्रपती संभाजीनगर : मोहोळ तालुक्यातील भोयरे येथील पंपगृहाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. डिसेंबर २०२५ अखेर उजनीचे पाणी तुळजापूरच्या रामदरा तलावात येईल, त्यामुळे सिंचनाच्या सोयी वाढतील, असा दावा पाटील यांनी केला. या कामाची पाहणी 'मित्र' संस्थेचे उपाध्यक्ष तथा तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी मंगळवारी केली. यावेळी त्यांनी वरील माहिती दिली.

मराठवाड्याच्या हक्काच्या कृष्णा खोरे प्रकल्पातील २.२४ अब्ज घनफूट पाणी ऑगस्टमध्ये घाटणे उच्च पातळी बंधाऱ्यात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रकल्पात एकूण सात अब्ज घनफूट पाणी मंजूर आहे. भूम-परंडा या भागासाठी मंजूर ३.१ अब्ज घनफूट पाण्याची कामे पूर्ण होण्यास आणखी एक वर्षाचा कालावधी लागू शकतो. मात्र, पहिल्या टप्प्यात पाणी येण्याची प्रक्रिया आता लवकर पूर्ण होईल असे, कार्यकारी अभियंता अमोल नाईक यांनी याप्रसंगी सांगितले.

मधल्या कालावधीत पावसाच्या पाण्यामुळे व अन्य नैसर्गिक व तांत्रिक अडचणींमुळे या कामाला विलंब लागला. त्यानंतर मात्र कामाने वेग घेतल्याचे अधीक्षक अभियंता विजय थोरात यांनी सांगितले. आता पुढील तीन महिन्यांत पंपगृहात पंप बसवण्याचे काम चालू होईल. त्यानंतर पुढील कामे आणि चाचण्या होतील. डिसेंबरअखेरपर्यंत उजनीचे पाणी रामदरा तलावात पडेल. दरम्यान रामदरा तलावातील पाणी तुळजापूर तालुक्यासह लोहारा व उमरगा येथे नेण्यासाठी सर्व्हे करून राज्य सरकारच्या मंजुरीनंतर निविदा काढण्यात येणार आहेत. रामदरा तलावात पाणी आल्यानंतर तुळजापूर मंदिराच्या विकास आराखड्यातून या तलावात बोटिंगची सोय केली जाणार आहे.

HINDUJA HOUSING FINANCE LIMITED

कॉर्पोरेट ऑफिस: १६७-१६९, २रा मजला, लिटिल माऊंट, सैदापेट, चेन्नई- ६०००१५.
शाखा कार्यालय: ३रा मजला सुशील बिल्डिंग विठ्ठल मंदिराच्यामागे अण्णाभाऊ साठे पुतळा नवीन मोंढा, नांदेड ४३१६०२

यांच्याशी संपर्क साधा: हरीश काची (एआरएम)- ८६५७६९७०६९, रुषिकेश उभाळे (एएलएम)- ९८२३२४४४९८, राहुल निकुरे (सीएलएम)- ९४०५४७३२०८ मिथलेश देहरिया (सीआरएम)- ८२२६००९३९९

परिशिष्ट - ४ [नियम ८(१)] ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांचे अधिकृत अधिकारी असल्याने, सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (कायदा क्र. ५४, २००२) अंतर्गत आणि सुरक्षा इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सहवाचता निर्देशित कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या कर्जदाराला/ जामीनदाराला मागणी सूचना जारी केली आहे. सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवस पूर्ण झाल्यानंतर, कर्जदार/ जामीनदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यानंतर, कर्जदार/ जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर निर्देशित नियमांच्या नियम ८ सहवाचता वरील कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

खाते क्रमांक आणि कर्जदारांचे नाव

एलएएन क्र. एमएच/एनडीडी/एनडीईडी/ए००००००००२५ | १. श्री. ज्ञानेश्वर विठ्ठलराव नवले (कर्जदार) **२. श्री. विठ्ठल नवले** (सह-कर्जदार) **आणि ३. श्रीमती रुकमाबाई नवले** (सह-कर्जदार) | **प्रतिकात्मक ताबा तारीख:** १२.०५.२०२५ | **मागणी सूचना तारीख आणि रक्कम:** २०.०१.२०२५ रु.४,७२,४९८/- करीता १८.०१.२०२५

सुरक्षित मालमत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता): जमीन, त्यावरील बांधकामासह, एन. पी. घर क्र. ९२७/१, एकूण मोजमापे ४५६ चौ.फूट (४२.३७ चौ.मीटर) असलेले, प्रभाग क्र. ९, अर्धापूर, मौजा- अर्धापूर, नगर पंचायत अर्धापूर येथे स्थित, जे नगर परिषद/ महामंडळाच्या हद्दीत आणि उप-निबंधक कार्यालय, तहसील- अर्धापूर आणि जिल्हा- नांदेडच्या अधिकार क्षेत्रामधील ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि परिशिष्ट मालमत्तेची चतु:सीमा आहे पूर्वेकडे: रस्ता, पश्चिमेकडे: शंकर नवले यांचे घर, उत्तरेकडे: रस्ता, दक्षिण बाजूला: शिवराम नवले यांचे घर

विशेषत: कर्जदार/ जामीनदार आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार हा वर नमूद केलेल्या मागणी केलेल्या रकमेसाठी आणि त्यावरील पुढील व्याजासाठी हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल.

दिनांक: १५.०५.२०२५
ठिकाण: नांदेड
सही/- अधिकृत अधिकारी- हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

फॉर्म क्र.-३ [पहा नियमन-१५(१)(ए)]/१६(३)

ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

तळ मजला, 'जिवन सुमन', बिल्डींग, प्लॉट क्र.३, एन-५, सिडको, औरंगाबाद-४३१००३
दावा क्र. : **OA/४८/२०२५** **नि.क्र. ११**

ऋण वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियमावली, १९९३ चे नियम ५ चे उप-नियम २(A) सह वाचण्यात येणारे कायद्याचे कलम १९ चे उपकलम (४) अंतर्गत समन्स

स्टेट बँक ऑफ इंडिया विरूद्ध **पठाण मोबीन खान दिलावर खान**

प्रति,
१) पठाण मोबीन खान दिलावर खान,
रा.मिलीया शाळेजवळ, भालदारपुरा, बीड, महाराष्ट्र-४३११२२, **येथे सुद्धा**: प्लॉट क्र.०७ (उत्तरेकडील भाग), सर्व्हे क्र.३२/ए/२, तळेगांव रोड, तरफ गिराम, बीड, महाराष्ट्र-४३११२२

समन्स

ज्या अर्थी **OA/४८/२०२५** नामदार पिठासीन अधिकारी/निबंधक यांचे समोर **दि.२४/०४/२०२५** रोजी सूचीबद्ध केले होते.
ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रू.२५,६१,०६५/-** कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्या विरूद्ध दाखल केलेल्या कायद्याचे कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली.
कायद्याचे कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.
(i) समन्स बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत कारणे दाखविण्यासाठी विनंती करण्यात आली ती का देण्यात येऊ नये,
(ii) मूळ अर्जाच्या अनु.क्र.३A अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मालमत्ता आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबीत असल्याने मूळ अर्जाच्या अनु.क्र.३A अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींच्या तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला प्रतिबंधीत करण्यात आले आहे;
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंधी बनवले आहे त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु.क्रमांक ३A अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
तुम्हाला **दि. ३०/०७/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **निबंधक यांचे समोर** हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

दि. ०१/०५/२०२५ रोजी माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने देण्यात आले.
(स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)
समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी
स्वाक्षरी/-
प्रभारी **निबंधक**
ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद
SHREE

ADITYA BIRLA CAPITAL — PROTECTING INVESTING FINANCING ADVISING

आदित्य बिर्ला हाउसिंग फायनान्स लि.

नोंदणीकृत कार्यालय : इंडियन रेयॉन कम्पाऊण्ड, वेरावल, गुजरात-३६२ २६६
शाखा कार्यालय : आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लि., निशा बाफना कॉम्प्लेक्स, बी-४०२, ४०३, बी-४०५, तिसरा मजला, रिलायन्स डिजिटलच्या वरती, आकाशवाणीसमोर, जालना रोड, औरंगाबाद-४३१ ००५.
१. एबीएचएफएल : प्राधिकृत अधिकारी – श्री. प्रियदर्शन लोणारे - संपर्क क्र. : ९८२२६९८५५६
२. ऑक्शन सर्व्हिस प्रोव्हायडर (एएसपी) : मेसर्स ई-प्रोक्युअरमेन्ट टेक्नोलॉजीस प्रा. लि. (ऑक्शन टायगर) श्री. राम शर्मा - संपर्क क्र. : ८०००२३२९७ व ९२६५५६२८१९

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.
१. याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे. सदर स्थावर मालमत्ता ऋणको म्हणजेच **चंद्रकांत मोहंती, चंद्रकांत मोहंती (दिवंगत राजेश्री चंद्रकांत मोहंती यांचे उपलब्ध कायदेशीर वारसदाराच्या क्षमतेत)** यांच्याकडील आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोची देणी, वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील पुढील व्याज व अन्य खर्च आणि **आयएनआर २०,७७,६४९.२१/- (रुपये वीस लाख सत्त्याहत्तर हजार सहाशे एकोणपन्नास व पैसे एकवीस फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता **०६.०६.२०२५** रोजी ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' व ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर लिलावाद्वारा विक्रीकरिता ठेवण्यात येणार आहे.
राखीव किंमत **आयएनआर १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त)** आणि इसारा रक्कम ठेव (इरठे) **आयएनआर १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त)** असणार आहे. इरठे जमा करण्याची शेवटची तारीख **०५.०६.२०२५** आहे. **उक्त मालमत्तेच्या पाहणीची तारीख ०४.०६.२०२५ रोजी स. ११.०० व दु. ०४.०० दरम्यान आहे.**

स्थावर मालमत्तेचे वर्णन

पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- उक्त प्रीमायसेस फ्लॅट नं. बी-१४, तिसऱ्या मजल्यावरील, एकूण मोजमापाचा ४४.२० चौ.मी. कार्पेट एरिया व ४९.५० चौ.मी. बिल्ट-अप एरिया, 'सॅफ्रन गॅलक्सी' म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील व येथे स्थित- भवसिंगपुरा, औरंगाबाद, ता. व जि. औरंगाबाद, गट नं. ५४/२, औरंगाबाद-४३१ ००२, महाराष्ट्र आणि पुढीलप्रमाणे सीमित: पूर्व: साइड मार्जिन खाली, पश्चिम: साइड मार्जिन खाली, उत्तर: साइड मार्जिन खाली, दक्षिण: फ्लॅट नं. बी-११.
विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर म्हणजेच https://homefinance.adityabirlacapital.com/properties-for-auction-under-sarfaesi-act किंवा https://sarfaesi.auctiontiger.net यावर तरतूद केलेली लिंक पाहावी.
स्थळ : औरंगाबाद
दिनांक : १५.०५.२०२५
प्राधिकृत अधिकारी, आदित्य बिर्ला हाउसिंग फायनान्स लि.

फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड — PhoenixARC — **ई-लिलाव-नि-विक्रीकरिता जाहीर सूचना**

नोंदणीकृत कार्यालय : तिसरा मजला, वॉलेस टॉवर, १३९-१४०/बी/१, सहार रोड व वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेची क्रॉसिंग, विलेपार्ले (पू), मुंबई-४०० ०५७. टेलि. : ०२२-६८४९ २४५०, फॅक्स : ०२२-६७४१ २३१३. सीआयएन : U67190MH2007PTC168303 ई-मेल : info@phoenixarc.co.in वेबसाइट : www.phoenixarc.co.in

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८ व ९च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारा आम जनतेस तसेच विशेषकरून ऋणको/ हमीदारांना सूचना देण्यात येते की, **मोतिलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेडद्वारा (अलिकडील ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड - अभिहस्तांकनकर्ता)** ऋणांच्या अभिहस्तांकनानुसार फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेडकडे गहाण असलेल्या व याखाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशिलानुसार www.phoenixarc.co.in/ या वेबसाइटद्वारा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८ व ९ यासह वाचलेल्या सरफेसी ॲक्टच्या तरतुदींनुसार याखाली सविस्तरपणे दिलेली देणी रक्कम व पुढील व्याज, आकार व किंमत इ.च्या वसुलीकरिता ''ऑनलाइन ई-लिलाव''द्वारा **''जसे आहे जेथे आहे'', ''जे काही आहे तेथे आहे'' व ''कोणत्याही आधाराशिवाय''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

ई-लिलावाची तारीख व वेळ : तारीख : ०४.०६.२०२५ स. ११.०० ते दु. ०२.०० (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह) | **इरठे जमा करण्याची शेवटची तारीख : ०३.०६.२०२५**

ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ लोन अकाऊन्ट नं.	मागणी सूचना तारीख व रक्कम	स्थावर मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत, इरठे
एलएएन : LXAUR00316-170039161 शाखा : औरंगाबाद ऋणको : सोमनाथ सूर्यकांत खंडागळे सह-ऋणको : सूर्यकांत रामभाऊ खंडागळे	**०७.१२.२०२०** **रु. ७,२०,९१८/-** (रुपये सात लाख वीस हजार नऊशे अठरा फक्त) **करिता**	मिळकत नं. ४३३. सर्व्हे नं. ३०१, येथे स्थित - जयसिंह नगर, हनुमान मंदिराजवळ, गंगापूर, औरंगाबाद-४३११०९, महाराष्ट्र.	**राखीव किंमत : रु. ४,५०,०००/- (रुपये चार लाख पन्नास हजार फक्त) इरठे : रु. ४५,०००/- (रुपये पंचेचाळीस हजार फक्त)**
एलएएन : LXAUR00417-180062299 शाखा : औरंगाबाद ऋणको : ईश्वर बबन गिरी सह-ऋणको : ललिता ईश्वर गिरी	**०७.०६.२०१८** **रु. ८,८७,८७९/-** (रुपये आठ लाख सत्त्याऐंशी हजार आठशे एकोणऐंशी फक्त) **करिता**	फ्लॅट नं. जी९, ४था मजला, राधाकृष्ण अपार्ट., अहिल्याबाई होळकर चौकाजवळ, प्लॉट नं. ५४ ते ५७६० ते ६१. गट नं. ७७, सातारा, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र, भारत	**राखीव किंमत : रु.४,५०,०००/- (रुपये चार लाख पन्नास हजार फक्त) इरठे : रु. ४५,०००/- (रुपये पंचेचाळीस हजार फक्त)**

ई-लिलावाच्या शर्ती व अटी : १. लिलावाचे आयोजन बोली कागदपत्रांच्या पुढील शर्ती व अटी आणि त्यात नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार करण्यात येत आहे. बोलीदार ई-लिलावाकरिता ठेवलेल्या सुरक्षित मत्तेचा तपशील, बोलीप्रक्रियेबाबत माहिती व सहाय्य याकरिता आमचे ई-लिलाव सेवा-पुरवठाकार **मेसर्स आर्का ईमार्ट प्रायव्हेट लिमिटेड**च्या https://www.auctionbazaar.com/ या वेब पोर्टलला भेट देऊ शकतील आणि बोली प्रपत्रे ऑनलाइन सादर करावयाची आहेत. स्वारस्य असलेले खरेदीदार सदर पोर्टलवर लिलाव शर्ती व अटी तसेच प्रक्रिया पाहू शकतील आणि संपर्क साधू शकतील : **संदीप उखार्डा रानित- ९३७२७०५४५४, संभाजी महादू गोलंगे- ९६६५३७५७५७, इशान देव- ८८२८२७३२३१** व सविस्तर तपशील वर नमूद केलेल्या वेबसाइटवर उपलब्ध आहे आणि त्यांच्या केंद्रीकृत हेल्प डेस्कवर संपर्क साधता येईल : +९१ ८३७०९ ६९६९६, ई-मेल आयडी : contact@auctionbazaar.com **२.** सर्व इच्छुक खरेदीदारांनी/ बोलीदारांनी **https://www.auctionbazaar.com/** या वर नमूद केलेल्या पोर्टलवर त्यांचे नाव नोंदविणे आणि पूर्वोक्त तारीख व वेळेत ई-लिलावात भाग घेण्याकरिता विनामूल्य युजर आयडी व पासवर्ड मिळविणे आवश्यक आहे. **३.** ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इच्छुक खरेदीदार/ बोलीदारांनी वर नमूद केलेल्या इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटच्या तारखेस किंवा तत्पूर्वी पॅनकार्ड, कंपनी असल्यास मंडळाच्या ठरावाची प्रत व पत्त्याचा पुरावा यांच्या प्रतीसह राखीव किमतीच्या १०%ची परतावा इसारा रक्कम ठेवीच्या प्रदानाचा तपशील सादर करावयाचा आहे. **स्वारस्य असलेले खरेदीदार/ बोलीदारांनी यावर सविस्तरपणे दिल्यानुसार प्रत्येक आयटम/ मालमत्तेकरिता स्वतंत्र इरठे सादर करणे आवश्यक आहे. ४.** लिलावाच्या कोणत्याही स्तरावर, प्राधिकृत अधिकारी कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय व त्याकरिता कोणतेही कारण न दाखविता लिलाव पुढे ढकलण्याचा किंवा बोली/ प्रस्ताव स्वीकारण्याचा/ नामंजूर करण्याचा/ फेरबदल करण्याचा/ रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवीत आहेत. **५.** यशस्वी खरेदीदार/ बोलीदाराने कोणतीही सांविधिक देणी, कर, देय शुल्क, खरेदी विचाराधीन लागू जीएसटी, स्टॅम्प ड्युटी, नोंदणी शुल्क इ. सोसतील, जे लागू कायद्यानुसार त्याच्या/ तिच्या नावे मालमत्तेच्या अभिहस्तांकनाच्या दृष्टीने प्रदान करणे आवश्यक आहे. **६.** स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी सांविधिक देणी इ. समाविष्ट सुरक्षित मत्तेस बाधक ठरणारे दावे/ हक्क/ देणी आणि लिलावात ठेवलेल्या सुरक्षित मत्तेचा नामाधिकार, भार या संबंधित त्यांनी स्वत: चौकशी करावी. लिलाव जाहिरात 'फिनिक्स'ची कोणतीही बांधिलकी किंवा प्रतिनिधित्व आहे असे मानीव ठरत नाही किंवा सिद्ध होत नाही. फिनिक्सचे प्राधिकृत अधिकारी त्रयस्थ पक्षकाराचे कोणतेही दावे/ हक्क/ देणी याकरिता कोणत्याही स्थितीत जबाबदार असणार नाहीत. **७.** भावी/ स्वारस्य असलेले बोलीदार वचनबद्धता लिहून देतील की, तो/ ती नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६च्या कलम २९(ए)च्या तरतुदीनुसार अपात्र नाही आणि केवायसी कागदपत्रांसमवेत सदर वचनबद्धता सादर करण्यास असमर्थ ठरल्यास तो/ ती आपोआप अपात्र ठरला/ ठरली जाईल किंवा त्याची/ तिची बोली नामंजूर करण्यात येईल.
स्थळ : महाराष्ट्र दिनांक : १५.०५.२०२५ **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड**
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

परिशिष्ट - ४-अ - स्थावर मालमत्तेची ई-लिलाव विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(६)च्या तरतुदीनुसार सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव-विक्री सूचना
नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११० ००१, फोन :०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेब : www.pnbhousing.com
शाखा कार्यालय : ई-१, ई-२ आणि ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेंटर, अदालत रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००१

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदार यांना रकाना क्र.-ए यामध्ये सूचित केलेले यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन कॉलम क्र.-डी यामध्ये गहाण/ सुरक्षित धनकोकडे केली आहे, **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने (रकाना क्र.-सी यामध्ये वर्णन केल्याप्रमाणे) ज्याचा रचनात्मक/ भौतिकदृष्ट्या ताबा सुरक्षित धनको यांनी घेतला आहे, त्याची खाली नमूद केलेल्या तपशिलांनुसार **''जसे आहे तिथे आहे, जे आहे तसे आहे आणि तेथे जे काही आहे या तत्त्वावर''** विक्री केली जाईल.
तारखेनुसार सुधारित असलेल्या सिक्युरिटी इंटरेस्ट अंमलबजावणी नियम, २००२ च्या नियम-८(६) आणि ९ अंतर्गत रकाना क्र. ए यात दर्शविलेल्या प्रकरणाप्रमाणे याद्वारे कर्जदार/ गहाण ठेवणारे/ कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अनोळखी), निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, संबंधित कर्जदार/ गहाणदार (मृत झाल्यापासून) यांना सूचना देण्यात आली आहे.
विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/सुरक्षित धनकोची वेबसाइट म्हणजेच, www.pnbhousing.com** यावर प्रदान केलेल्या दुव्याचा संदर्भ घ्या.

कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम आणि तारीख (बी)	ताब्यात घेण्याचे स्वरूप (सी)	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आरपी) (ई)	ईएमडी (आरपीच्या १०%) (एफ)	बोली सादर करण्याची अंतिम तारीख (जी)	बोलीवृद्धी दर (एच)	तपासणीची तारीख आणि वेळ (आय)	लिलावाची तारीख आणि वेळ (जे)	ज्ञात भार न्यायालयीन प्रकरणे, जर असतील तर (के)
एचओयू/एआरएनजी/०२२०/ ७८०७३१ बालचंद रमेश मालपाणी/ राधिका बालचंद मालपाणी बीओ : औरंगाबाद	रु. ३२,४९,४२२.१७ आणि दि. १२.०५.२०२३	भौतिक	फ्लॅट क्र. ४०५, सीटीएस क्र. १६३१८, प्रताप नगर, शाहनूरवाडी, चौथा मजला, सुरज सुफलाम, महाराष्ट्र- ४३१ ००१	रु. ३७,२३,०००	रु. ३,७२,३००	१९.०६.२०२५	रु. १०,०००	दि. ०४.०६.२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. ते ०४.०० वा.	दि. २०.०६.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वा. ते ०३.०० वा.	*शून्य/ माहीत नाही

***आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. देय झाल्याच्या तारखेपर्यंत आणि/ किंवा त्याची प्राप्ती होईपर्यंत संबंधित पुढील व्याज @१८% दरसाल लागू आहे. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीसाठी आणि माहितीनुसार, यावर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मालमत्तेसंदर्भात इतर कोणतेही दायित्व/ दावे नाहीत, जे कॉलम क्र.-के यामध्ये उघड केले आहे. यशस्वी खरेदीदार/ बोलीदाराकडून त्याच्या/ तिच्या शेवटी पूर्ण केले जातील/ अदा केले जातील. संभाव्य खरेदीदार/ बोलीदारांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी नमूद केलेल्या भारांची सत्यता स्वतंत्रपणे पडताळून पाहावी. (१.)** आजपर्यंत, कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नाही, आणि/ किंवा न्यायालयीन मनाई पीएनबीएचएफएल/ पीएनबीएचएफएल यांचे अधिकृत अधिकारी, वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मालमत्तेची विक्री, विल्हेवाट लावण्यापासून, आणि/ किंवा विक्री करण्यापासून आणि स्थिती स्तंभ क्र. के यामध्ये नमूद केली आहे. **(२.)** संभाव्य खरेदीदार/ बोलीवर आणि इच्छुक पक्ष स्वतंत्रपणे कार्यवाही/ ऑर्डर इ. जर असेल तर, कॉलम क्र.-के यामध्ये नमूद केलेल्या बाजूची तपासणी करू शकतात, पीएनबीएचएफएल यांच्याकडे उपलब्ध असलेल्या शीर्षकाच्या दस्तऐवजांच्या शीर्षकासह; परंतु त्यापुरते मर्यादित नाही आणि निविदा/ बोली अर्ज सादर करण्यापूर्वी किंवा प्रस्ताव देण्याआधी सर्व बाबतीत स्वत:चे समाधान करून घ्या. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली अर्जासह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **(३.)** कृपया लक्षात घ्या की, सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ९(३) यानुसार, बोलीदार/ खरेदीदार विक्री किमतीच्या २५% रक्कम, (इसारा ठेव अनामत रकमेसह) त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसानंतर जमा करण्यास कायदेशीररीत्या बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, २००२च्या नियम ९(२)नुसार, सुरक्षित धनकोने विक्री किमतीच्या २५% रक्कम प्राप्त केल्यानंतरच (बोलीदाराच्या नावे) विक्रीची पुष्टी केली जाऊ शकते. विक्री पुष्टीकरण पत्र मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत उर्वरित ७५% रक्कम खरेदीदाराने जमा करावी लागेल आणि अशी ठेव न भरल्यास, अधिकृत अधिकारी विक्री पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री विचारणा रकमेचा काही भाग जप्त करेल आणि सरफेसी कायद्याच्या तरतुदींनुसार मालमत्ता/ तारण मालमत्ता पुन्हा विकली जाईल. **(४.) मे. सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारे विक्री आयोजित करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याला मदत करेल जिचे प्लॉट नं. ६८, ३ रा मजला, सेक्टर ४४, गुडगाव, हरियाणा-१२२ ००३ येथे कॉर्पोरेट कार्यालय आहे. वेबसाइट- www.bankeauctions.com. मालमत्तेची तपासणी किंवा बोली कागदपत्र मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, तुम्हाला गणेश अंकुश/ नीलाक्षी पाटील यांच्याशी समन्वय साधावा लागेल संपर्क क्रमांक: १८०० १२० ८८००, ई-मेल: auction@pnbhousing.com, हे पीएनबीएचएफएलचा अधिकृत व्यक्ती आहे किंवा www.pnbhousing.com याचा संदर्भ घ्या.**
ठिकाण : औरंगाबाद, दिनांक : १४.०५.२०२५ सही/- अधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि. — equitas Equitas Small Finance Bank
{आधी इक्विटास फायनान्स लि. म्हणून ओळखले जाणारे}
नोंदणीकृत कार्यालय: क्र. ७६९, स्पेंसर प्लाझा, ४था मजला, फेज-२, अण्णा सलाई, चेन्नई, तामिळनाडू- ६००००२. # ०४४-४२९९५०००, ०४४-४२९९५०५०

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) सहवाचता सरफेसी कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदारांना, सह-कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, येथे खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण ठेवण्यात आली आहे, ज्याचा भौतिक ताबा इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, ज्याची दि. १६.०६.२०२५ रोजी ''जसे आहे जिथे आहे'' ''जसे आहे जे आहे स्थिती'' यामध्ये विक्री केली जाईल, जेणेकरून इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि., यांना देय असलेली रक्कम खालील कर्जदारांकडून वसूल केली जाईल.

अ. क्र.	कर्जदार आणि जामिनदाराचे नाव आणि पत्ता एकूण थकित + व्याज	स्थावर मालमत्तेचे वर्णन
१. २.	**श्री. शरद भीमराव पाटील, भीमराव पाटील यांचा मुलगा श्रीमती मनीषा शरद पाटील, शरद पाटील यांच्या पत्नी दोघेही राहणार येथे:** प्लॉट क्र. ६, गट क्र. ३०५, आमदडे ता. भडगाव, जि. जळगाव ४२४१०५ **कर्ज खाते क्र.: एसईपीसीओआरए०३०९५५० दाव्याची देय रक्कम रु.२४२३०६/- दि. २०.०६.२०२४ रोजीनुसार दि. २१.०६.२०२४** रोजीपासून मासिक विश्रांती, शुल्क आणि खर्च इत्यादींसह पुढील व्याजासह. **(एकूण थकबाकी रु.३८७२५१/- दि. ०५.०५.२०२५ रोजीनुसार).**	**मालमत्ता-** १ प्लॉट क्र. ६ असलेली मालमत्ता, मोजमापे ३७.२० चौ. मीटरच्या पश्चिम भागाच्या पलीकडे मोजमापे २२३.२० चौ. मीटर क्षेत्रफळ, गट क्र. ३०५ च्या ३७.२० चौ. मीटर क्षेत्रफळाचा लगतचा भाग, मौजे आमदाडे, ता. भडगाव, जिल्हा जळगाव येथे स्थितचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, उत्तरेस: रस्ता; दक्षिणेस: बाबूलाल अर्जुन पाटील यांचे घर; पूर्वेस: त्याच भूखंडाचा उर्वरित भाग; पश्चिमेस: ३७.२० चौ. मीटरचा उर्वरित भाग उपनिबंधक भडगाव आणि जळगावच्या नोंदणी जिल्ह्याच्या उप-नोंदणीमध्ये स्थित. जमिनीशी जोडलेल्या किंवा जमिनीशी जोडलेल्या कोणत्याही गोष्टीशी कायमचे जोडलेले, वर्तमान आणि भविष्यातील, सर्व इमारती आणि संरचना आणि त्यासोबत जोडलेले सर्व सुविधा/ मामूल हक्कांसह. **आरक्षित किंमत: रु.४,४९,०००/- इसारा ठेव अनामत: रु.४४,९००/- अधिकृत अधिकाऱ्याचे नाव आणि संपर्क: सागर चव्हाण: ७९७२३२८४७५**

लिलावाची तारीख: १६.०६.२०२५
खरेदी आणि विक्रीबद्दल तपशील आणि प्रश्नांसाठी:
इच्छुक बोलीदार/ खरेदीदारांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी **ईएसएफबी शाखा** आणि लिलाव मालमत्तेला भेट द्यावी आणि स्वत: चौकशी करावी आणि अतिरिक्त शुल्क, भार आणि कोणतेही तृतीय-पक्ष हितसंबंध तपासावेत आणि बोली सादर करण्यापूर्वी सर्व बाबींमध्ये स्वत:चे समाधान करावे. सर्व वैधानिक देय जसे की मालमत्ता कर, वीज/ पाणी देय आणि इतर कोणतीही देयके, जर असतील तर, यशस्वी बोलीकर्त्याद्वारे निश्चित केली जातील आणि भरली जातील. इच्छुक बोलीदारांनी पोर्टलवर स्वत:ची नोंदणी करावी आणि लॉगिन आयडी आणि पासवर्ड आगाऊ मिळवावा.
इच्छुक खरेदीदार/ बोलीदाराने **''इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड''** यांच्या खात्यात **एनईएफटी/ आरटीजीएस/ डीडी याद्वारे इसारा ठेव अनामत (ईएमडी)** ची रक्कम सादर करणे आवश्यक आहे, **खाते क्र. २००००८०७७२५ आणि आयएफएससी कोड- ईएसएफबी०००१००१,** भाग्यम गॅलेरिया, नवीन क्र. १८, बाजुल्ला रोड, टी. नगर, चेन्नई- ६०००१७, कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकेचा दि. १३.०६.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी काढलेले असावे.
ई-लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या, **www.equitasbank.com** आणि **https://www.bankeauctions.com.**
''सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या सर्व मजकुराबाबतच्या अधिक स्पष्टतेसाठी इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध केलेली नोटीस ग्राह्य धरण्यात येईल.''
दिनांक: १५.०५.२०२५
ठिकाण: (जळगाव, संभाजीनगर), चेन्नई
''सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या सर्व मजकुराबाबतच्या अधिक सुस्पष्टतेसाठी इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध केलेली नोटीस ग्राह्य धरण्यात येईल.''
सही/-, अधिकृत अधिकारी, इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

SBI The banker to every Indian

प्राधिकृत अधिकारी यांचा तपशिल
नाव : रिझवान अन्सारी
शाखेचा ई-मेल : sbi.12953@sbi.co.in
मोबाईल क्र. : 8369645337 / 9766983979, फोन नं. 0240 - 2480664

भारतीय स्टेट बँक,
तणावग्रस्त मालमत्ता वसुली शाखा
प्लॉट नं.१, सिडको टाऊन सेंटर, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३

अचल/चल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-ऑक्शन विक्री सूचना परिशिष्ट IV-A व II-A (नियम ८(६) व ६(२) मधील तरतुद पहा)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८(६) व ६(२) सह वाचले जाणारे दि सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२, तहत अचल/चल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-ऑक्शन विक्री सूचना.
तमाम जनतेस आणि विशेषत: कर्जदार व जामीनदार यांना याद्वारे सुचीत करण्यात येते की, धनको बँकेकडे संरक्षीत तारण/बोजा असलेली खालील नमुद अचल/चल मालमत्ता ज्याचा प्रत्यक्ष भौतिक ताबा **भारतीय स्टेट बँक, तणावग्रस्त मालमत्ता वसुली शाखा, औरंगाबाद** यांचे अधिकृत अधिकारी यांनी घेतलेला आहे, सदरील मालमत्ता **दिनांक ३०/०५/२०२५** रोजी **''जशी आहे तशी'', ''जी काय आहे ती'',** आणि **''जी काय तेथे आहे ती'', ''विना आधार'',** या तत्वावर **भारतीय स्टेट बँक, तणावग्रस्त अस्ति वसुली शाखा, औरंगाबाद** यांना खालील संरक्षीत ऋणको यांचेकडून येणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी **विक्रीस काढलेली** आहे. **कर्जदार, जामीनदार व मालमत्ता याचा सविस्तर तपशिल आणि ई-ऑक्शन साठीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे....**

अ. क्र.	कर्जदाराचे नांव आणि जामीनदाराचे नांव	थकीत रक्कम ज्याच्या वसुलीसाठी मालमत्ता विकली जाणार आहे	मालमत्तेचे सविस्तर वर्णन	तपशिल
१	**सौ.मानसी शितल इंगळे** आणि **श्री.शितल संदीप इंगळे** द्वारा अशोक सिताराम राजकडे, स्वामी सावली, प्लॉट क्र.६२, सर्व्हे क्र.१८८, मयुरपार्क जवळ, मारुतीनगर, मारुती मंदीरच्या मागे, छत्रपती संभाजीनगर	**रू. ३४,२३,४०८.००** (दि. २१/०७/२०२२ पर्यंत + पुढील व्याज, दंड आणि खर्चासहीत)	**सौ.मानसी शितल इंगळे आणि शितल संदीप इंगळे यांचे नावावरील 2 BHK फ्लॅट क्र. बी-४, पहिला मजला, 'तेजल संकुल', राजतारा गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट क्र.१ व २, गट क्र.१६९, हर्सुल, औरंगाबाद, बांधीव क्षेत्रफळ ४५.७५ चौ.मी.,** ज्याची चतु:सिमा **पूर्व** : फ्लॅट क्र.ए-३ **पश्चिम** : फ्लॅट क्र.बी-३ **उत्तर** : मोकळी जागा **दक्षिण** : मोकळी जागा	**राखीव किंमत रू. २९,४६,०००/-** (ज्याखाली मालमत्ता विकली जाणार नाही) राखीव किंमतीच्या १०%, **अनामत रक्कम (EMD) रू. २,९४,६००/-** बोली वाढ रक्कम **रू. ५०,०००/- पटीत** Property ID: **SBIN0012953001**

टिप :- कुठेही संबंधीत असलेले सर्व वैधानिक/खाजगी देयता, कर, मुल्यांकन, शुल्क इत्यादी भरण्याची संपुर्ण जबाबदारी ही यशस्वी खरेदीदाराची राहील. ज्या मालमत्ता ५० लाखांपेक्षा जास्त किंमतीच्या आहेत त्यास लागणारा १% TDS भरावा लागेल. प्लान्ट आणि मशीनरी आणि इतर चल मालमत्तेसाठी १८% GSTलागु राहील.
इच्छुक बोलीदारांनी बोली-पूर्व अनामत रक्कम ई-ऑक्शन संपण्यापूर्वी ebkray (PSB Alliance) कडे भरणा करावे. बोलीदारास बोली-पूर्व अनामत रक्कमेचे क्रेडीट हे ebkray (PSB Alliance) च्या बँक खात्यात पैसे जमा झाल्यावरच मिळेल आणि सदरील बाबतीचे अपडेशन हे ई-ऑक्शन वेबसाईट वर राहील. या साठी बँकेच्या प्रक्रियेनुसार थोडा वेळ लागेल, त्याकरिता बोलीदारांनी सुचित करण्यात येते की, बोलीदारांनी त्याच्या स्वत:च्या फायद्यासाठी व शेवटच्या क्षणाची घाई व संकट टाळण्यासाठी बोली-पूर्व अनामत रक्कम थोडी आगाऊ वेळेत भरावी.

ई-ऑक्शन ची तारीख व वेळ : दिनांक ३०/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० पर्यंत प्रत्येकी १० मिनीटांचे वेळ विस्तारासह.
मालमत्तेची पाहणी करण्याची दिनांक २१/०५/२०२५ रोजी सकाळी १२.०० ते दुपारी ३.०० पर्यंत
ई-ऑक्शन सेवा पुरवठादार मे. PSB Alliance Private Ltd. यांचे वेबसाईट पोर्टल https://ebkray.in या वरून लिलाव करण्यात येईल. (हेल्पडेस्क नं. 918291220220)
अधिक माहितीसाठी मोबाईल क्र. 8369645337 / 9766983979 | ई-मेल : sbi.12953@sbi.co.in यावर संपर्क करावा.
लिलाव विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्ती **https://bank.sbi/web/sbi-in-the-news/auction-notices/bank-e-eauctions** या वेबसाईटच्या लिंक वर उपलब्ध आहेत.
दिनांक : १३-०५-२०२५
ठिकाण : छत्रपती संभाजीनगर
(टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)
सही/- **प्राधिकृत अधिकारी भारतीय स्टेट बँक** तणावग्रस्त मालमत्ता वसुली शाखा, छत्रपती संभाजीनगर
SHREE